Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# दलित स्त्रीच्या वेदनेचा करूण स्वर: पाणी कुठवर आलं ग बाई

**प्रा. डॉ.लक्ष्मण ब. थिट्टे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नळदुर्ग.
मोबाईल नं. 9960618515, ईमेल - laxmanthitte@gmail.com

**प्रास्ताविक:**

1960 नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने स्फूर्ती घेऊन साहित्याच्या क्षेत्रात अनेक प्रवाह निर्माण झाले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य व आदिवासी साहित्य या सर्व साहित्याच्या अग्रस्थानी प्रेरणा होती महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स व सर्व मानवतावादी मूल्य, जे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांना न्यायिक पातळीवर उतरवून मानवाच्या कल्याणाचा विचार करतात. स्वातंत्र्यानंतरची पहिली पिढी तळागाळातून येऊन शिक्षण घेऊ लागली. मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालय व औरंगाबाद येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यात शिकणाऱ्या दलित, शोषित, श्रमजीवी स्त्रिया, कामगार घटकाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात होते व या व्यक्तींनी बाबासाहेबांच्या विचारांना भारावून साहित्याची निर्मिती केली. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, शरणकुमार निंबाळे, दया पवार, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे ,लक्ष्मण माने, किशोर काळे, राजा ढाले, नरेंद्र जाधव, उर्मिला पवार, हिरा बनसोडे इत्यादी साहित्यिकांनी बाबासाहेबांच्या वैचारिक अधिष्ठानावर ज्ञानाच्या मशाली पेटवून प्रतिभावाने लेखणी चालविले. ती लेखणी काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन यातून अधोरेखित होऊ लागली. दलित साहित्यात 'काव्य' लेखन खूप मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. नामदेव ढसाळ (गोलपिठा), बाबुराव बागुल (वेदाआधी तू होतास), केशव मेश्राम( उत्खनन), यशवंत मनोहर (उत्थान गुंफा),वामन निंबाळकर (गावकुसाबाहेरील कविता) ज. वी. पवार (नाकेबंदी), नारायण सुर्वे (माझे विद्यापीठ), प्रल्हाद चेंदवनकर (ऑडिट), अर्जुन डांगळे (छावणी हालते आहे), त्र्यंबक सपकाळ (सुरुंग), हिरा बनसोडे (पौर्णिमा) दया पवार (कोंडवाडा), लोकनाथ यशवंत (आता होऊन जाऊ द्या), भुजंग मेश्राम (उलगुलान), उत्तम कांबळे (जागतिकीकरणातील माझी कविता) यासारख्या अनेक कवींनी दलित काव्य खूप मोठ्या प्रमाणात लिहून दलित आत्मभान जागृत केले. त्यामध्ये दया पवार हे नाव उल्लेखनीय आहे. म्हणून त्यांच्या काव्यसंग्रहावरील 'दलित स्त्रीच्या वेदनेचा करुण स्वर: पाणी कुठवर आलं ग बाई 'हा शोध निबंध मी अभ्यासासाठी घेतला आहे.

**कवीचा परिचय :**

दया पवार (दगडू मारुती पवार) यांचा जन्म १५ सप्टेंबर १९३५ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील अकोले या गावी झाला. १९५६ मध्ये मुंबईतील पशुवैद्यक महाविद्यालयात त्यांनी

लेखनिक व प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून नोकरीस सुरुवात केली. १९६७ मध्ये अस्मितादर्श मध्ये त्यांची पहिली कविता प्रकाशित झाली. त्यांनी विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती केली. बलूतं (आत्मकथन), कोंडवाडा, पाणी कुठवर आलं ग बाई (काव्यसंग्रह), विटाळ (कथासंग्रह), बलुतं एक वादळ, चावडी (फुटलेखन), पासंग, जागल्या (स्तंभलेखन), धम्मपद (अनुवाद) असे अनेक साहित्य त्यांचे प्रकाशित होऊन त्यांना बलुतं (१९८९) राज्य शासन पुरस्कार, कोंडवाडा (१९७४) राज्य शासनाचा पुरस्कार, पद्मश्री (१९९०) पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांचे उल्लेखनीय कार्य म्हणजे १९८८ ते १९९४ मध्ये 'बालभारती पाठ्यपुस्तक समितीचे' सदस्य (१९८७ ते १९९४), महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधन समितीचे सदस्य (१९९३), महाराष्ट्र राज्य नाट्य परीनिरीक्षण मंडळाचे सदस्य, फील्डडिव्हिजनच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरावरील लघुपटाचे कथालेखन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील जब्बार पटेल यांनी प्रदर्शित केलेल्या चित्रपटात पटकथा लेखक १९९४ ते १९९५ मध्ये परिवर्तन साहित्य महामंडळाचे अध्यक्ष अशा वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी भरीव असे योगदान देऊन कार्य सिद्धीस नेले.

**पाणी कुठवर आलं ग बाई मधील 'दलित स्त्रीच्या करून वेदना'**

'पाणी कुठवर आलं ग बाई' हा दया पवार यांचा काव्यसंग्रह १९९८ साली मेहता पब्लिकेशन हाऊस, मुंबई यानी प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहात एकूण ३८ कविता आहेत. या काव्यसंग्रहातील बऱ्याच कविता स्त्रीविषयक मनाची, तिच्या सामाजिक दुःखाची, स्वतःच्या दुःखाची साक्ष देणाऱ्या आहेत. तर काही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आणि येशूचे महात्म प्रतिपादित करणाऱ्या आहेत. या काव्यसंग्रहात 'पाणी' हे दुःखाचे प्रतीक म्हणून आलेले आहे. दलित व्यक्तीला जातीयतेमुळे होणारे दुःख तर दलित स्त्रीला एक दलित स्त्री म्हणून वाट्याला आलेलं दुःख व एक स्त्री म्हणून वाट्याला आलेला दुःख हे मोठ्या दाहकतेने दलित कवींनी काव्यातून वेगवेगळ्या प्रतिमांच्या साहयाने मांडलेले आहे. दलित साहित्यिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षण घेऊन दलितउध्दाराचे जे महान कार्य केले व हजारो वर्षाचा काळोख ज्ञानरूपी प्रकाशाच्या शोधात होता तो सूर्य होऊन प्रज्वलीत केला. त्या प्रज्ञा सूर्याच्या एकूण व्यक्तिमत्वावर साहित्य लिहिणे, समाज व्यवस्थेतील बिकट परिस्थिती, उच्चवर्णीय यांचा जाच, धर्माच्या नावाखाली दडपून टाकू पाहणारे मानव. देव, धर्म आणि देश यांच्यापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्या मानवाला रूढी परंपरा, जाती आणि धर्म यातून निर्माण झालेली अस्पृश्यता यांच्या जोखडात अडकून आपला स्वार्थ साधण्याचा केलेला प्रयत्न आणि त्यातून गाठला जातो वेदना, दुःख, लाचारी, गुलामगिरी, स्त्रीपण आणि बहिष्कृत यांचे जीवन याचा कळस. डॉ. बाबासाहेबांनी या सर्व समाज घटकाला 'स्व' च्या जगण्याचे, 'स्व' अस्तित्वाचे व त्याच्या हक्काचे आत्मभान जागृत होऊन स्वाभिमानाने जगण्याचा, अस्तित्वासाठी लढण्याचा व हक्कासाठी संघर्ष करण्याचा, संघटित होऊन एकनिष्ठ, एकेश्वर वादाचा पुरस्कार करण्याचा मंत्र दिला. त्याच 'स्व'साठी दलित साहित्यिक डॉ. बाबासाहेब यांनी पेटवलेली दलित चळवळीची मशाल घेऊन जागृत करत आहेत. याबाबत कवी म्हणतात,

"बाबा तुम्ही म्हणाला
खेडी सोडा शहरात चला
तिथं धर्मांधता नाही
कर्मकांड नाही
अस्पृश्यतेचे
इंचू -इंगळ्याचे पेव नाही"[१]

(बाबा कालपरवाची गोष्ट, पृ. क्र.६)

डॉ. बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत, स्त्री आणि पुरुष हा समाज व्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा असा असणारा घटक आहे. स्त्री ही कोणाची आई, पत्नी, बहीण, मुलगी, प्रेयसी अशी वेगवेगळी भूमिका घेऊन समाज व्यवस्थेतील बिकट परिस्थितीचा सामना करत जगत असते. तिला वडील, पती, भाऊ व मुलगा प्रियकर या सर्वांचा जाच सहन करावा लागतो.

डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यता दूर व्हावी, व्यक्तीच्या हाताला काम मिळावे व स्वाभिमानाने जगता यावे यासाठी दलित व्यक्तींना शहराकडे धाव घ्यावी असे सांगितले; कारण त्या ठिकाणी जात, धर्म, मानली जात नाही. यासाठी बाबासाहेबांनी जनता, मूकनायक, बहिष्कृत भारत या मासिकांचा वापर करून दलित व्यक्तींचा स्वाभिमान जागृत केला; पण बाबासाहेब गेल्यानंतर मात्र भारतीय राज्यघटनेच्या साहृयाने जे दलितांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यातून जे सार्वभौमत्व दिले होते तेही कमी होऊ लागले, कारण शासन व्यवस्थाच आपल्या पद्धतीने त्याचा वापर करू लागली. म्हणून कवी म्हणतो की, 'यासाठी आता पुन्हा मूकनायकाचा बुलंद आवाज करण्याची गरज आहे' विंचू, इंगळी हे विषन्न व्यवस्थेचे प्रतिक म्हणून कवीने साकार केले आहे.

डॉ. बाबासाहेबांना मुर्तीपूजा मान्य नव्हती. पण त्यांच्या अविरत कार्यामुळे त्यांना दलित व्यक्तींनी देवाचे स्थान देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या प्रतिमा घराघरात लावल्या व त्यांचे पुतळेही बांधली गेले. याबाबत अनंत सुर असे म्हणतात की, "डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण जीवन म्हणजेच धगधगता रणसंग्राम आहे."[२] कारण, डॉ. बाबासाहेब यांनी माणसा- माणसातील द्वेष कमी व्हावा यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, गोलमेज परिषदेत केलेले दलितांचे नेतृत्व, हिंदू कोडबिल, भारतीय राज्यघटनेची निर्मिती हे महान कार्य करत असताना त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. स्वतःचे रक्त सांडावे लागले. या संघर्षाचे वारे झोपडपट्टी पर्यंत पोहोचून ती जळाली, खानबन जळाले, भारत ही संतांची भूमी पण या संतांच्या भूमित तुमचा विटाळ झाला. तो तुम्ही आपल्या अविरत कार्याने धुऊन टाकला. दिव्याने दीवा पेटावा, तसा तुम्ही ज्ञानाच्या मशाली पेटवून मना-मनात दडलेला विषमतेचा काळोख नाहीसा केला. अशा प्रकारचे विचार डॉ. बाबासाहेबांविषयी कवीने व्यक्त केले आहे.

कवीने स्त्री जीवनाचे चित्रण करत असताना तिला आई, माया, अशा उपमा देऊन तिला होणारे दुःख, कारुण्य आणि तिची प्रथेला विरोध करण्याचा संघर्ष अभिव्यक्त केला आहे. या

काव्यातील स्त्री दारिद्र्याने ग्रासलेली असली तरी ती परिस्थिती समोर हतबल कधीच झाली नाही. तिचं जीवनच कष्टांनी, दुःखांनी भरलेल असल्यामुळे कष्ट करूनच ती आपला संसार चालवण्याचा प्रयत्न करते,पण कोणापुढे हात पसरवीत नाही. म्हणून कवी म्हणतात,

'धन्याचा हा माल सारा
गेला गेला खळ्यावरी
कणसाच्या दाण्यासाठी
माय हिंडे रानोमाळी"
(सरवा, पृ..क्र. १)

घरची परिस्थिती ही अतिशय नाजूक असल्यामुळे माय ही सरवा वेचण्यासाठी दुसऱ्याच्या शेतात जात असे. सरवा बघता-बघता तिचा पाय ढेकळावून सरकतो व तिच्या पायात ज्वारीचे धसकट घुसून पाय रक्तबंबाळ होतो; पण तिला आपल्या लहान मुलांच्या पोटाची काळजी असते. जर आपण धान्य नेले नाही तर आपली मुले उपाशी राहतील म्हणून ती उन्हातानात सरवा वेचून एका एका कणसासाठी राणोमाळ भटकून तो गोळा करण्याचे काम करते. पण जमीनदाराला मात्र ती धान्य मागत नाही.

स्वातंत्र्यानंतर देशातील गरिबी दूर करण्यासाठी अनेक पंचवार्षिक योजना अमलात आणल्या, पण समाजात जे श्रीमंत आहेत त्यांनीच साऱ्या योजनांचा फायदा घेतला. याबाबत डॉ. जनार्धन वाघमारे असे म्हणतात की, “प्रस्तापित वर्गाला सामाजिक परिवर्तन मान्य नाही; कारण ते त्यांच्या हिताच्या सोईचे आहे.”[3] कारण देशातील जमिनी राजकारण्यानेच हडप केल्या. धरणे बांधले, मंदिर बांधले यातून माणसांचा द्वेष करू लागले. म्हणून कवी म्हणतात,

"घुसळ घुसळते बाई
अजून लोणी का ग नाही
साऱ्या गाई झाल्या वांझ
बैल केले ग गाभण
स्वातंत्र्याची ही नवलाई"
(लोणी, पृष्ठ क्र.१९)

वरील ओळीत गाई हे 'स्त्री' शोषणाचे प्रतीक म्हणून आलेले आहे. तर ‘बैल’ हे शोषितांचे प्रतीक म्हणून आले आहे. दलितांचा विकास होण्याऐवजी त्यांची कशी कोंडी होईल तेच पाहिले जाते असे वाटते. काही माणसे दिखाऊ पणाने वागतात; परंतु मात्र जातीव्यवस्थेची त्यांची नाळ घट्ट बांधलेले असते. ते अस्पृश्यांना कढीपत्त्यासारखे अलगत बाहेर टाकतात. मानवांच्या मतलबीपणाचे वर्णन कवीने केले आहे. या शोषित, जातीहिनतेचे चटके संत चोखोबाला ही भोगावे लागले. त्याला मंदिर प्रवेश नाकारला म्हणून कवी थेट संतांच्या आराध्य दैवत असलेल्या विठ्ठलालाच प्रश्न विचारतो की,

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

"पंढरीच्या राया
चोखा का बाहेरी
तूच खरा डोंगा
दावीली पायरी"

(पायरी, पृ. क्र.२०)

चोखोबाने तुझी सेवा मनोभावे केली पण त्याला तुझ्या मंदिरात मात्र येऊ दिले नाही. त्यासाठी त्याला समाजकंटकांचा दगडांचा मार खावा लागला. असे दाहक अनुभव कवी व्यक्त करतो.

स्त्री आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी आपल्या जीवाची पर्वा करत नाही. तिने का आपली कुस बदलली की सारे कुटुंब तिच्या विरोधात जाते. म्हणून कवी म्हणतात की,

"अरे माणसा माणसा
तुझी पराकोटी हाव
काडी काडी जमविता
तुझे हरवले गाव"

(मरणाच्या फांदीवर ,पृष्ठ क्र.२१)

जीवनात सर्व काही मिळविण्यासाठी हाव धरली जाते पण हाव मागे व मरण पुढे असते. जे गाव, घर, कुटुंब उभे करण्यासाठी जो प्रयत्न करत असतो, त्याने कितीही जातियतेचे, धर्माचे वाडे जरी बांधले असले तरी स्त्रीला मात्र तो त्या वाड्यात कोंडवाड्याचेच जीवन जगविण्यासाठी भाग पाडतो. डॉ. बाबासाहेबांनी स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी व स्त्रियांना स्वाभिमानाने जगण्यासाठी हिंदूकोड बिलाची निर्मिती केली, पण तिचा स्वीकार मानवतेचे पुजारी असणाऱ्या मानवानेच नाकारला. म्हणून डॉ. बाबासाहेब यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांना आशा होती की धर्म धार्जीन्या माणसांच्या पापाचा घडा भरणार आहे, त्यांच्या पायाखालची माती सरकणार आहे, ती सरकली. मुलींचे जन्माचे प्रमाण कमी होऊन त्यांच शोषण, गर्भातच त्यांचा मृत्यू, लैंगिक अत्याचार, बलात्कार यांचे प्रमाण वाढवून ती असुरक्षित झाली, तेव्हा कोठे डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टी असणाऱ्या विचारांची जाणीव होऊन मग ते बिल अमलात आणले.

सोळाव्या शतकात पाश्चिमात्य स्त्री मेरी उलस्टोन क्रॉफट यांच्या विचारातून जागी झाली असली तरी तिचे शोषण मात्र तेथेही सुरू होते. सातासमुद्रापार जेव्हा कवी जातो तेव्हा त्याला तिथेही हॉटेलमध्ये, डान्सबार मध्ये तरुण मुली पाच-दहा डॉलर्ससाठी झगा वर करून स्त्रीत्व बहाल करून प्रेक्षकांची मुर्दाड मने जिंकण्याचा प्रयत्न करत असतात. म्हणून कवी म्हणतो,

"पाच दहा डॉलर साठी झगावर करणाऱ्या
काळा जांभळ्या मरतुकड्या पोरी

हारलेंमचा नाका का  गोळपिठयाचा नाका
का अनुयुगातले आदिमानवांचे बेट
तेथेही हंटिंगचा न्याय चालतो"
(साता समुद्र पल्याड, पृष्ठ क्र.३२)

आपल्या देहाचे प्रदर्शन मांडणाऱ्या मुलींच्या जीवनाचे आणि गोलपिठाच्या नाक्यावर शरीर विकून पोट भरणाऱ्या स्त्रियांचे आयुष्य किती मातीमोल होऊन जाते. प्रसंगी धंदे करत असताना अचकट विचकट शिव्या आणि हाणामारी ही तिला पोट भरण्यासाठी सहन करावी लागते. त्याचवेळी कवीला आपली  कष्ट करणारी, व्याकुळ झालेली आई आठवते. तो म्हणतो,

"हायब्रीड, बापाची बेवारशी लेका वळ
तेथेही अक्कर माशांची आई भेटते
डोळे व्याकुळलेले -गाईच्या डोळ्या सारखे
तिच्या डोळ्यात मला माझी आई दिसते"
(साता समुद्रा पल्याड,पृष्ठ क्र.२५)

अनैतिक संबंधातून जन्मलेल्या बेवारस मुलांची परदेशातही खूप मोठी गर्दी असते. 'अक्करमासी' म्हणजे वडील उच्च जातीचे तर आई ही अस्पृश्य, खालच्या जातीची. दोघांच्या अनैतिक संबंधातून जन्मलेल्या मुलाला 'रांडेच' पोर अशी शिवी हसडावी तसे शब्द तीक्ष्ण होत जातात काळजावर कोरलेल्या गोंधळासारखे. म्हणून कवींनी भोवतालच्या दलित, शोषित, श्रमिक आणि स्त्रियांच्या वेदनामुळे जगण्याला, दुःखाला लेखणीद्वारे वाचा फोडली. त्यांना आपल्या आईसारखेच डोळे जे गाईच्या डोळ्यासारखे निष्पाप आहे ते दिसले आणि त्यांना आपली आई आठवते. जी आपले पोट भरण्यासाठी मोळी विकते. आपला संसार चालवते. यावरून आपणास असे म्हणता येईल की, स्त्रीला आपले तारुण्य, सोम्यता आणि पोटाचा दुष्काळ हे स्त्रीत्वाला शाप ठरते. याबाबत डॉ. बिरा परसे असे म्हणतात की, "दलित कवितेला एक नवे परिणाम, नवे सामर्थ्य प्राप्त करून देण्याचे महत्वाचे कार्य दया पवार यांनी केले."[४] यावरून आपणास असे म्हणता येईल की, तिला सामाजिक जीवनातील जातीयता, श्रेष्ठकनिष्ठता आणि अवहेलना सहन करून समाज व्यवस्थेविरुद्ध जाती अंतरी व्यवस्थेविरुद्ध असे दुहेरी जीवन जगावे लागते असे वाटते.

विदेशात जेव्हा कवी मद्याची सूरई हातात घेतलेल्या वेटरला पाणी मागतात तेव्हा तो त्यांना 'तू इंडियन' आहेस का? असा प्रश्न विचारतो, परंतु आपल्या देशात मात्र पाणी मागताच जात आठवते. कवी म्हणतात,

"मद्याची सुरई  हाती घेतलेली
प्लीज गीव मी वॉटर
वाईन पिणाऱ्या देशात
मी पाणी मागताच

त्याच्या ओठातून सनई पाझरते
'आर यू इंडियन'
माझ्या मनात कल्लोळ
फुटलेल्या जंगल हाका
जिव्हारी लागलेला बाण
खरंच का मी इंडियन?
माझ्या देशात
पाणी मागताच जात आठवते "

(स्वातंत्र्य देवीचा पुतळा,पृष्ठ क्र.२५, २६)

जातीयतेचे वास्तव दया पवार यांनी भोगल्यामुळे आपल्या देशाची संस्कृती ही परदेशातील संस्कृतीपेक्षा वेगळी जाणवते असे वाटते.

भारतीय संस्कृतीत नवीन विवाह झाल्यानंतर जेव्हा पती-पत्नी घरी येतात. तेव्हा त्यांच्यावरून भाकरीचा तुकडा ओवाळला जातो. धन धान्याने भरलेला आठवा उंबरा ओलांडताना सांडून ती गृह प्रवेश करते. काही दिवस तिचे बरे चालते, पण हळूहळू तो आपले रंग दाखवतो. तिने त्याच्याकडून ठेवलेल्या अपेक्षा व तिचे स्वप्न यांना काहीच किंमत नाही. म्हणून कवी म्हणतो,

"माझ्या उनाड घरात पाहत
तू म्हणालीस
किती रे खोटारडा
म्हणाला चल माझ्या देशा
तिथं आडात गुळवणी
अन झाडाला कानवली
मी ओशाळून म्हणालो
अगं आपण दोघे खणू आड
मग लावू कानवल्याचे झाड"

(आडात गुळवणी, पृष्ठ क्र.२८)

कानवले हे पती-पत्नी, प्रियकर- प्रेयसी यांच्या प्रेमाचे प्रतीक आहे. ते गव्हाचे कणीक, नारळाचे छोटे तुकडे, गूळ घालून तयार करतात. त्याला वेगळीच चव असते. पण लग्नाला जसजसे दिवस लोटतील तसतसे त्याचे प्रेम ओसरून जातो. कित्येक उन्हाळे पावसाळे निघून जातात. त्याच्या मनात आड बांधण्याचे व कानोले करण्याचे विचारच येत नाही. घरात सुख, संतान, प्रेम याला ती पूर्ण विसरून जाते. ही खंत कवी व्यक्त करतो.

जीवनाचा मांडव रचता रचता उभी हयात निघून जाते. वेल मांडवावर गेला तरी जीवनात सुख मिळत नाही. म्हणून कवी म्हणतात,

"मांडव रचता रचता
कधी हयात ग गेली
वेल मांडवावरती जात
सुखा चव नाही आली"

(मांडव,पृष्ठ क्र.२९)

दोघेही आता थकलेले आहेत. भागलेले आहेत. दोघांनीही भोगलेल आहे आणि आता एकमेकांच्या आधाराशिवाय राहत आहेत आहे. वादळात सापडलेल्या थरथरत्या पानासारखी चित्त जुन्या आठवणींनी व्याकुळ होऊन एखाद्या महापुरात कमरेचा भोपळा सुटून आपण निराधार वाटवे तसे आपले अस्तित्व खोल -खोल आत लोटले जात आहे. म्हणून कवी म्हणतात,

"का कुणास ठाऊक
वादळात सापडलेल्या
थरथरत्या पानासारखं
चित्त व्याकूळ होतो"

(महापूर, पृष्ठ क्र.)

वादळ, भोपळा, सुटणे, महापूर या प्रतिमांच्या साहाय्याने स्त्रीला निराधाराचे जीवन वाटायला आल्याचा प्रत्यय येतो असे वाटते.

अमावस्येच्या रात्री करवंदी बनात, काळ्या जांब कातळावर तुझे माझे एकमेकात गुंफलेले शरीर ओल्या चिंब घामाने भिजवून आयुष्याच्या अनेक पायऱ्या उतरून गेल्यावर सुद्धा क्षणिक सुखासाठी जन्मापासून जातीतेचा विषारीं नाग ज्याच्याकडे नागमणी आहे. तो सूड घेऊ बघतो. म्हणून कवी म्हणतो,

"सकाळ होताच रात्रीचे आपण नसतो
कायापालट झालेलो
सुखातही दुःख कालवणारा जन्मापासून जखडलेला
माझ्यावर ठणकणारा मनी
फुत्कार टाकणारा -उजेडी जागा होनारा"

(ठणकनारा मनी,पृष्ठ क्र.३१)

'नागमणी' हे विषारी जाती व्यवस्थेचे निशाण म्हणून या कवितेत आले आहे. या नाग मन्याचा विळखा स्त्री दाष्यत्त्वाला जखडलेला खीळ आहे. तो रात्री वेगळा असतो व दिवस निघाल्यावर आपला रंग बदलतो असे कवीला सुचित करायचे आहे. तरी स्वतःला सुशोभित करण्यासाठी साज, शृंगार करते; पण त्यामुळे तिच्याकडे बघणाऱ्या ज्या नजरा असतात त्या तिला नागाच्या फना सारख्या वाटतात. म्हणून कवी म्हणतात,

"केला हाताचा पाळणा
डोळ्याचा झाला दिवा
काट्यावर मी बांधला
माझ्या सपनाचा ग झुला"

(सोन्याची ग बाई सुरी, पृष्ठ क्र.३६)

मी जे स्वप्न बघितले ते झुल्याप्रमाणेच झुलत राहिले. असे कवीला वाटते. स्त्रीला आठवते मग चिलमाचं गाव. ज्या गावात सकाळी उठून दळण दळावे लागतो. ते दळण दळत असताना तिला जात्याच्या घरघरी मधून आपले दुःख सांगावेसे वाटते. याबाबत डॉ .म. सू पाटील असे म्हणतात की, "दया पवारांचे कविमन एकंदरीने पाहता बरेच संयंत आहे, त्याला वाचकांचे भान विशेष आहे. आपल्या वर्गाच्या वाटेला आलेल्या भोगवट्याने ते अस्वस्थ होते; पण ते अक्रस्थाळे बनत नाही."[५] यावरून आपणास असे म्हणता येईल की दया पवार यांनी वेगवेगळ्या प्रतिमा घेऊन साहित्याची निर्मिती केली.

आपल्या मुलाची तहान भागावी म्हणून आई पाणी आणण्यासाठी भर उन्हात बारवावर जाते. जाताना तिच्या पायात काहीच नसल्याने तिच्या पायाला फोडे येतात. ती त्याची पर्वा करत नाही. म्हणून ती म्हणते,

'घाम आमचा सांडला
त्या पाण्याच्या ग पायी
आले हाताला ग फोड
शिरशीर उसवली
पाणी कुठवर आलं ग बाई"

(पाणी कुठवर आलं ग बाई,पृष्ठ क्र.४१)

पाण्यासाठी दलित व्यक्तीने विहीर बारवे खोदावे पण त्याला पाणी लागल्यानंतर मात्र त्याची पूजा करून शुद्धीकरण करण्याचे काम स्पृश्य व्यक्ती करत असत व ज्या व्यक्तींनी विहीर खोदली त्यालाच पाणी भरण्यास मज्जाव केला जात असे.

कवीची आई जेव्हा पाणी भरण्यासाठी विहिरीवर बारबावर जात असे तेव्हा वाटेत मारूतीचे मंदिर होते. ते तिच्या सावलीने बाटल्यामुळे पाणी आणण्यासाठी वाट तिला बदलावी लागली. काट्यातून, चिखलातून तिला पाणी आणण्यासाठी जावे लागते. म्हणून ती म्हणते,

"तुझ्या बारवाच पाणी
जशी दुधाची ग साय
माझ्या सावली ग पायी
ते ग नासणार नाही."

(पाणी, ४२)

म्हणून ती आपल्या सखीला सांगते की, माझ्या सावलीने तुझ्या बारवाचे पाणी बाटनार नाही. खराब होणार नाही. अशा प्रकारे आपण 'दलित स्त्रीच्या वेदनेचा करूण स्वर : पाणी कुठवर आलं ग बाई' या कविता संग्रहाच्या आधारे बघितला आहे.

**निष्कर्ष:**

'पाणी कुठवर आलं ग बाई' या काव्यसंग्रहातील कविता या जितक्या स्वानुभवांशी बांधलेल्या आहे, तितक्याच सामाजिक जीवनाचे भान देणाऱ्या आहेत. स्त्रीजीवणाचे, मनाचे, कष्टाचे, दुःखप्रद वर्णन करतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि येशू ख्रिस्तांच्या महान जीवन चरित्राचाही संदर्भ देऊन जातात असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ:**

१. दया पवार: पाणी कुठवर आल ग बाई, मेहता पब्लिशिंग हाऊस,मुंबई, प्र.आ.१९९८, पृष्ठ क्र.६.

२. आनंद यादव: दया पवारांची कविता, आकलन आणि आस्वाद, देवयानी प्रकाशन मुंबई प्र. आ. २००९

३. डॉ. जनार्दन वाघमारे :दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आ. २०१४, पृ. क्र .५६.

४. डॉ.बिरा बारसे: दलित कवितेतील अस्मिता, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००८, पृष्ठ क्रमांक ११९.

५. म. सु. पाटील : दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, पद्‌यगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१०, पृष्ठ क्रमांक ५१.